**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.–416 004, महाराष्ट्र
दूरध्वनी2690571, 2693643, 2693730
परीक्षा नियत्रंक कार्यालय दूरध्वनीः 2693176, फॅक्सः 0231&2690655
इतर परीक्षा–2 विभाग विस्तारित दूरध्वनी 2609120 FAX: 0091-0231-2691533 & 0091-0231-269233

Estd: 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF-28TH Rank

**Ref.:No. /SU/O.E.1/2/3/4/EXAM/M.A./ 2145** **Date : 05 -08-2017**

# अत्यंत महत्वाचे परिपत्रक

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख / मा. संचालक
अधिविभाग / केंद्र / दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर 416 004

प्रति,
मा. संचालक / मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय – ऑक्टों., 2017 च्या परीक्षेसंबंधित महाविद्यालयांनी / अधिविभागांनी / दूरशिक्षण केंद्राने घ्यावयाच्या दक्षतेबाबत.**
**संदर्भ– Ref.:No. /SU/O.E. 2/3/EXAM/M.A./2104, Date : 03-08-2017**

**महोदय / महोदया,**

**ऑक्टों. / नोव्हें., 2017 च्या सत्रातील होणा–या परीक्षेच्या बाबतीत महाविद्यालयांनी / अधिविभागांनी / दूरशिक्षण केंद्रांनी खालीलप्रमाणे काळजीपूर्वक कार्यवाही करावी :–**

## अ. रजिस्ट्रेशन –

1. सुधारित अभ्यासक्रमातील सेमी. 1च्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे जून्या अभ्यासक्रमाप्रमाणेच रजिस्ट्रेशन करावयाचे असून परीक्षा अर्ज भरताना नविन सुधारित अभ्यासक्रमाप्रमाणे अर्ज भरावयाचे आहेत. **(M.A.(Language & Social Science), MPA, MRS, MSW, MBA(YCSRD), B.Pharm, M.Pharm, B.Ed., M.Ed.,(Integrated) etc. )**

2. सर्वांनी त्यांच्याकडे प्रवेशित सेमी 1 च्या विद्यार्थ्यांची विषयानुसार एकूण विद्यार्थी संख्येची स्वतंत्र यादी तयार करून संबंधित विभागाकडे देणे.

## ब. परीक्षा अर्ज भरताना घ्यावयाच्या दक्षता –

1. सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज वेळेत जमा झालेत की नाहीत, याची खात्री करावी. काही तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा अर्ज संगणक प्रणालीमध्ये भरला गेला नसल्यास, तो मॅन्युअली स्विकारावा असे सांगितला असल्यास, विहीत मुदतीत तो संगणक प्रणालीत घेतला असण्याची व तो संबंधित परीक्षा विभागाकडे जमा केल्याची खात्री करावी, याची सर्व जबाबदारी संबंधितांची राहील.

2. विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज युनिशिवाजी पोर्टलला भरण्यात आले आहेत, याची खात्री करावी. जर काही परीक्षा अर्ज ऑनलाईन भरण्याबाबत त्रुटी असल्यास संदर्भाधीत पत्रामध्ये उल्लेख केल्यानुार आय.टी. सेल ला संपर्क साधावा.

3. **विहीत मुदतीनंतर परीक्षा अर्ज स्विकारण्याबाबत कोणत्याही विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडे पाठवू नये.**

4. सर्वांनी त्यांच्याकडे प्रवेशित विद्यार्थ्यांची एकूण विद्यार्थी संख्या विषयानुसार संबंधित विभागाकडे देणे.

5. परीक्षा अर्ज भरताना काही विद्यार्थ्यांकडून चुकीचे विषय भरले जातात, त्यांची तपासणी होणे अपेक्षित असते. यास्तव अर्ज भरून झाल्यावर ऑनलाईन प्रत काढून, ती विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून विद्यापीठ प्रणालीत योग्य ते बदल करून घेण्याची कार्यवाही विहीत मुदतीतच होणे अपेक्षित आहे. परीक्षेवेळी विद्यार्थ्यांच्या विषयात कोणत्याही प्रकारचा बदल परस्पर करू नये.

6. सर्वांनी ऑनलाईन प्रणालीत आपली समरी जनरेट करून, ती पूर्ण तपासणेही गरजेचे आहे. आपल्याकडे अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थी संख्या व त्यांनी निवडलेले विषय, यावरून सर्वांनी समरी तपासणे गरजेचे आहे. समरीमध्ये जर एखाद्या अभ्यासक्रमातील विषय किंवा विषय वार असणारी विद्यार्थी संख्या यामध्ये काहीही त्रुटी अढळल्यास तात्काळ परीक्षा विभागाशी संपर्क साधावा.

7. क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा निर्धारित वेळापत्रकानंतर घेतल्या जातात. त्यासाठी महाविद्यालयाकडून स्वतंत्र प्रस्ताव मागविला जातो. सदर प्रस्ताव पाठविताना विद्यार्थी स्पर्धेला जाण्यापूर्वी, तसेच योग्य नमून्यात अर्ज सादर करावा. तसेच विद्यार्थ्यांनी त्या परीक्षेसाठी निवडलेले विषय, ज्या विषयांची परीक्षा द्यावयाची आहे ते विषय व त्या विषयांचे कोड, महाविद्यालयाचे नाव, सेंटरचे नाव, पीआर एन नं. , बैठक क्रं. , खेळाचा कालावधी इ. आवश्यक योग्य ती माहिती परीक्षा सुरू होण्यापूर्वी संबंधित विभागास देणेत यावी.

8. दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांना परीक्षासाठी उपलब्ध असणा—यां सोयी व सवलती मिळण्यासाठी आवष्यक असणारे अर्ज विद्यापीठाच्या वेबसाईटवर www.unishivaji.ac.in/exam/circular मध्ये उपलब्ध आहेत. कृपया ते योग्य प्रकारे भरून परीक्षा सुरू होण्याच्या पूर्वी 1 महिना अगोदर विद्यापीठात संबंधित विभागास जमा करावेत. जेणेकरून सदर विद्यार्थ्यांना परीक्षा देताना योग्य त्या संधीचा लाभ घेता येईल.

## ब. टर्मवर्क/प्रॅक्टीकल/सत्रकर्मचे गुण भरण्यासंबंधीच्या सूचना — टर्मवर्कच्या गुणामध्ये यापुढे कोणताही बदल केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ऑनलाईन याद्यी देण्यापूर्वी खालील बाबींची दक्षता घेणेत यावी.

1. टर्मवर्कचे व प्रॅक्टीकलचे गुण भरण्यासाठी संगणक प्रणालीची लिंक सुरू झाल्यानंतर विहीत मुदतीतच भरून, तपासूनच विद्यापीठांतील संबंधित विभागाकडे जमा करावयाचे आहेत.

2. विहीत मुदतीनंतर/ऑनलाईन प्रणालीची लिंक बंद झाल्यानंतर गुण भरल्यास, सदर गुण भरलेले दिसतात. परंतु निकालाच्या वेळी सदरचे गुण लेजरला येत नाहीत. सदर विद्यार्थ्याचा अशा विषयांना निकाल अबसेंट जाहीर होतो.

3. काही विद्यार्थ्यांचे निवडलेला विषय वेगळा असतो व त्यांचे टर्मवर्कचे मार्क दुस—यांच विषयांना भरले जातात. तरी परीक्षा अर्जात जो विषय निवडला असेल, त्याच विषयांना टर्मवर्क/प्रात्याक्षिकचे मार्क येणे अपेक्षित आहे.

4. तांत्रिक अडचणीमुळे एखादया विषयाचे गुण पाठवावयाचे राहून गेल्यास, ते लेखी परीक्षेच्या शेवटच्या पेपर नंतर 15 दिवसांपर्यंतच पाठवावेत, असा व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्रं.32 नुसार संमत झालेला आहे. त्यामुळे त्यानंतर टर्मवर्क/प्रात्यक्षिकचे गुण आल्यास, उशिरा आल्यास ते कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

5. टर्मवर्कचे गुण भरताना विद्यार्थी Present/Absent असताना अनुक्रमे Absent/Present केले जातात. अशा अबसेंट विद्यार्थ्यांस गुण दिले जातात. निकालानंतर त्याबद्दल बदलांसाठी विचारणा केली जाते. तरी याद्या तपासूनच देणेत याव्यात.

6. जून्या किंवा सुधारित अभ्यासक्रमातील ज्या गुणदान पध्दती असतील त्याप्रमाणेच गुणदान करणेत यावे व तसे झाले आहे का? याची खात्रीही करावी. तसेच ज्या सिस्टीम मध्ये तो अभ्यासक्रम असेल त्याच सिस्टीम मध्ये टर्मवर्क भरावेत.

## क. पर्यवेक्षकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत–

1. परीक्षा कार्यकालात ज्या–त्या संबंधित परीक्षक/पर्यवेक्षकांनी ऑनलाईन ॲबसेंट व प्रेझेंट रिपोर्ट भरून उत्तरपत्रिका जमा करताना, त्याची ऑनलाईन भरलेली प्रिंट मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडे जमा करावयाच्या आहेत. त्याशिवाय उत्तरपत्रिका जमा केल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

## म. निकाल जाहीर केल्यानंतर घ्यावयाच्या दक्षता. –

1. काही तांत्रिक अडचणीमुळे निकालानंतरही विद्यार्थ्यांचे गुण दिसत नसल्यास (टर्मवर्क/प्रात्यक्षिक/लेखी पेपरचे गुण दिसत नसल्यास किंवा विद्यार्थ्यांचा पूर्ण निकाल दिसत नसल्यास) निकाल जाहिर झाल्यापासून सर्व प्रकारच्या त्रुटींचे विद्यार्थ्यांचे अर्ज 1 महिन्याच्या आत संबंधितांनी संबंधित परीक्षा विभागात सादर करावयाचे आहेत.
2. <u>विद्यार्थ्यांना अर्जसह विद्यापीठात परस्पर पाठवू नये. विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित महाविद्यालयांनी/केंद्रांनी/विभागांनी एकत्रित करावेत व ते सर्व एकत्रित अर्ज संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रासहीत संबंधित विभागात जमा करावयाचे आहेत. जेणेकरून विद्यार्थ्यांना माहिती देताना कर्मचा–यांचा वेळ जाणार नाही व कामाचा निपटारा जलद गतीने होईल.</u>
3. निकाल जाहिर झालेपासून 1 महिन्यात सर्व त्रुटींचे अर्ज महाविद्यालयामार्फत स्विकारले जातील. त्यामुळे निकाल जाहिर होताच संबंधित महाविद्यालयांनी जाहीर निकाल विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावेत. तसेच सदर बाब पुढील परीक्षा अर्ज भरण्यापूर्वीच दुरूस्त करून घेणेची आहे.
4. पात्रते अभावि निकाल प्रलंबित राहिल्यास, नियमित विद्यार्थ्यांनी पात्रता विभागाशी व बहिःस्थ विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण केंद्राशी संपर्क साधून ऑनलाईन पात्रता कायम करण्याविषयी कळविणे, विद्यार्थ्यांनी या संदर्भात परीक्षा विभागाशी संपर्क साधू नये.

**कळावे,**

**आपला विश्वासू,**

**सही/–**

**उपकुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी**